# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.05.2024** **वारःबुधवार**

---

1.लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी प्रचाराला वेग; पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांची आज नाशिकमध्ये जाहीर सभा,

2.विधानपरिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुका लांबणीवर,

3.घाटकोपर जाहिरात फलक दुर्घटना प्रकरणी गुन्हा दाखल, पुण्यातील  जाहि रात फलकांचं स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचे आयुक्तांचे आदेश आणि

4.भीमा कोरेगाव प्रकरणी अटकेत असलेले गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर.

**<u>पंतप्रधानसभा</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात राज्यातल्या ११ जागांसाठी येत्या २०  मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यासाठीच्या प्रचारानं आता वेग घेतला आहे. पंतप्रधान आणि भाजपाचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी आज नाशिकमध्ये जाहीर सभा घेणार आहेत. दुपारी एक वाजता निफाड तालुक्यातल्या पिंपळगाव बसवंत इथं त्यांची सभा होईल. त्यानंतर ते कल्याणमध्ये सभेला संबोधित करतील आणि संध्याकाळी मोदी मुंबईत घाटकोपर इथं पथफेरी काढणार आहेत.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्याही आज नाशिकमध्ये सभा होणार आहेत.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि शेवटच्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वाराणसी लोकसभा मतदारसंघातून भाजपा उमेदवार म्हणून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

**<u>उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस</u>**

देशात नरेंद्र मोदी यांचं सरकार राहिल्यास २०२६ नंतर देशात महिला राज येईल, असं मत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केलं. डहाणू इथं आयोजित महायुतीच्या कार्यकर्ता मेळाव्यामध्ये काल ते बोलत होते. महायुतीचे पालघर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ हेमंत सावरा यांच्या प्रचारासाठी डहाणूमध्ये हा मेळावा झाला.

**<u>दिव्यांगबस</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात मुंबईमध्ये येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. यावेळी एकही मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांच्या सोयीकरता विशेष वाहतुकीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. विधानसभा मतदारसंघानिहाय ठरवलेल्या एका निश्चित मार्गावर बेस्टमार्फत ही मोफत बस सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, असं जिल्हा दिव्यांग समन्वयक अधिकारी प्रसाद खैरनार यांनी सांगितलं.

**<u>मतदान टक्केवारी</u>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या अंतिम आकडेवारीनुसार पुणे शहर लोकसभा मतदार संघात  ५३ पूर्णांक ५४ शतांश टक्के मतदान झालं. एकंदर २० लाख ६१ हजार २७६ मतदारांपैकी ११ लाख ३ हजार ६७८ मतदारांनी मतदानाचा आपला हक्क बजावला. गेल्या निवडणुकीत पुणे शहर मतदार संघात एकंदर ४९ पूर्णांक ८९ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली होती. यावेळच्या निवडणुकीत त्यात केवळ ३ पूर्णांक ६५ शतांश टक्के वाढ झाल्याचं दिसून आलं आहे.

**<u>विधान परिषद निडणूक</u>**

निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाची निवडणूक पुढे ढकलली आहे. या निवडणुका शाळांच्या उन्हाळी सुट्ट्यांच्या कालावधीनंतर घेण्याबाबत आयोगाकडे निवेदन आल्यानंतर आता केंद्रीय निवडणूक आयोगाने हा निर्णय घेतला. मुंबई पदवीधर मतदारसंघातून विलास पोतनीस, कोकण पदवीधर मतदारसंघातून निरंजन डावखरे, नाशिक शिक्षक मतदारसंघातून किशोर दराडे आणि मुंबई शिक्षक मतदारसंघातून कपिल पाटील ७ जुलैला विधानपरिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे १० जून रोजी निवडणूक घेण्याचं आयोगानं यापूर्वी जाहीर केलं होतं.

**<u>दुर्घटना</u>**

मुंबईत घाटकोपरच्या छेडानगर इथं लोखंडी जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेप्रकरणी होर्डिंग कंपनीचे मालक भावेश भिडे आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा शोध सुरू असल्याची माहिती पंतनगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश केवळे यांनी दिली. या दुर्घटनेत १४ जणांचा मृत्यू झाला; ४२ जणांवर रुग्णालयात उपचार सुरू असून एक जण गंभीर आहे. काही जणांना उपचारानंतर रुग्णालयातून सोडण्यात आलं आहे.

पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते रमेश चेन्नीथला आणि नाना पटोले यांनी काल घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली; तसंच जखमींची विचारपूस केली. या अपघातातील मृत्यू बीएमसी प्रशासन आणि राज्य सरकारच्या बेपर्वाईचे बळी असल्याचा आरोप नाना पटोले यांनी केला आहे.

**<u>इंट्रो</u>**

**<u>पुणेआयुक्त</u>**

दरम्यान, मुंबईतल्या होर्डिंग दुर्घटनेनंतर पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी काल अधिकाऱ्यांची बैठक घेतली. पुणे शहरातील सर्व जाहिरात फलकांचं ऑडिट करण्यात येईल, असं भोसले यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. काल १ हजार ५६४अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्यात आली, असं सांगून ते म्हणाले --

**<u>भीमाकोरेगाव</u>**

भीमा कोरेगाव प्रकरणी अटकेत असलेले गौतम नवलखा यांना सर्वोच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला आहे. न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश आणि न्यायमूर्ती एस.व्ही.एन. भाटी यांच्या खंडपीठाने मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशावरची स्थगिती वाढवण्याची विनंती काल  फेटाळून लावली. सुनावणी आणखी लांबणार असल्याचं मत नोंदवत न्यायलयानं हा जामीन मंजूर केला. दरम्यान, नवलखा वृद्धत्वाच्या कारणास्तव नजरकैदेत होते, याकरता पुरवलेल्या सुरक्षेसाठीचा २० लाख रुपयांचा खर्च नवलखा यांना द्यावा लागेल,   असे निर्देशही न्यायालयानं दिले आहेत.

**<u>छ.संभाजीमहाराज जयंती</u>**

छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती काल पुण्यासह राज्यभरात विविध ठिकाणी साजरी करण्यात आली. राज्यपाल रमेश बैस यांनी राजभवन इथं छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

**<u>इंट्रो</u>**

**<u>यक्षगान</u>**

कर्नाटकच्या यक्षगान या लोककला प्रकाराचं मराठीत सादरीकरण करण्याचा पहिलाच प्रयोग सिंधुदुर्ग जिल्ह्यात नुकताच झाला. ऐकुया याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**<u>स्क्रिप्ट</u>**

**यक्षगान ही कर्नाटकची प्रसिद्ध लोककला कन्नड भाषेतच सादर केली जाते. त्यातले संवाद आणि गीत कन्नड मधेच असतात. पण सिंधुदुर्ग जिल्ह्यातले यक्षगान आणि दशावताराचे अभ्यासक प्राध्यापक विजयकुमार फातर्फेकर यांच्या प्रयत्नातून यक्षगान चक्क मराठीत सादर करण्यात आलं. उडुपी कर्नाटक इथल्या यक्ष संजीव यक्षगान केंद्राचे प्रमुख आचार्य संजीव सुवर्णा यांच्या संस्थेतल्या कलाकारांनी  सावंतवाडी, वेंगुर्ले आणि कुडाळ तालुक्यात आंदुर्ले इथं चक्रव्यूह नाटकाचे हे तीन प्रयोग सादर केले. या प्रयोगातले सर्व कलाकार हे कानडी आणि इतर भाषिक होते. पण कुठेही भाषेचा अडसर न येत रसिकांना मंत्रमुग्ध करण्यात हे कलाकार यशस्वी ठरले. विशेष म्हणजे या प्रयोगात आठ महिला कलाकारांनी सादरीकरण केलं. मराठीतून यक्षगान सादरीकरणाचा अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग असल्याचं प्रा. विजय फातर्फेकर यांनी सांगितलं. खरतर तळकोकणातला दशावतार काय किंवा कर्नाटकच्या किनारपट्टी भागातला यक्षगान काय, भिन्न भाषा, भिन्न संस्कृती आणि भिन्न प्रांतातल्या राबणाऱ्या कष्टकरी, माणसांच्या जीवनाशी निगडित असलेल्या लोककला. पण भाषेचा अडसर दूर केल्यावर हि यक्षगान लोककला नेहमी दशावतार पाहणाऱ्या तळकोकणातल्या नाट्य रसिकांना वेगळीच अनुभूती देऊन गेली एवढं मात्र नक्की. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी. निलेश जोशी सिंधुदुर्ग**

**<u>मसाप</u>**

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीनं देण्यात येणारा 'मसाप जीवनगौरव' पुरस्कार प्रसिद्ध लेखिका डॉ. मीना प्रभू यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ भाषा अभ्यासक आणि लेखिका डॉ. अंजली सोमण पुरस्कृत या पुरस्काराचं स्वरूप २५ हजार रुपये आणि सन्मानपत्र असं आहे. मसापचा 'डॉ. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार' फ्रान्सिस वाघमारे यांना जाहीर झाला आहे. २७ मे रोजी मसापच्या वर्धापनदिन समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जातील, अशी माहिती कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांनी दिली.

**<u>गो-ग्रीन</u>**

महावितरणच्या गो-ग्रीन योजनेतील वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर बंद करण्यात आला आहे. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील १ लाख ८४ हजार २२० वीजग्राहकांनी केवळ ई-मेल आणि एसएमएसचा पर्याय निवडला असून त्यांची २ कोटी २१ लाख रूपयांची वार्षिक बचत झाली आहे. गो-ग्रीन योजनेनुसार छापील वीजबिलाऐवजी ई-मेल आणि एसएमएसचा पर्याय निवडला तर प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येते. त्यामुळे या योजनेत वीजग्राहकांनी सहभागी होण्याचं आवाहन पुणे प्रादेशिक संचालक अंकुश नाळे यांनी केलं आहे.

**<u>पाऊस</u>**

नाशिक जिल्ह्यात गेल्या काही दिवसात वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसाचा फटका ४१ गावातील ५१३ हेक्टरवरील पिकांना आणि फळबागांना बसला आहे. या नुकसानाचे पंचनामे करायला सुरुवात झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे.

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातल्या वातावरणात गेल्या आठ दिवसांपासून कमालीचा बदल होत आहे. सकाळपासून कडक ऊन आणि दुपारनंतर वादळी वाऱ्यासह पावसामुळे शेतपिकांसह इतरही नुकसान मोठ्या प्रमाणावर होत आहे.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात तुरळक ठिकाणी परवा १७ तारखेपर्यंत जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भात असाच इशारा आज आणि उद्यासाठी देण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.